## तातडीचे


# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१,२,५ व ६, हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई-४०० ००१

☎ ०२२-२२०५७४०९ / २२०७२०९७ E-mail : mah-sforum@nic.in Website : https://grahak.maharashtra.gov.in/


क्र.राआ/महा./आस्था-३/सांगली अति.जि.मं./२०१५/३२७४ दिनांक २८/०५/२०१५

**वाचा** ः १) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना क्र.ग्रासंक-१२०८/७६४/प्र.क्र.१६४/ग्रा.सं.-३, दिनांक २७ जुलै, २०११,

२) या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र.

अ) राआ/महा./आस्था/नियुक्ती/अध्यक्ष जि.मं./२०१३/३३४, दि.४.२.२०१३,

ब) राआ/महा./आस्था/नियुक्ती/गै.न्या.सदस्य जि.मं./२०१३/३५१ व ३७०, दि.४.२.२०१३

क) राआ/आस्था/जि.मं./सांगली अति./२०१३/८१३, दि.६.३.२०१३

ड) राआ/आस्था/जि.मं./सांगली अति./२०१३/८१४, दि.६.३.२०१३

३) या कार्यालयाचे पत्र क्र.राआ/महाराष्ट्र/आस्था/जि.मं.कामकाज/२०१३/६०४, दि.२० फेब्रुवारी, २०१३

## -ः **कार्यालयीन आदेश** ः-

सांगली जिल्हा मंचासमोर प्रलंबित प्रकरणांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने या कार्यालयाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावानुसार शासनाने वर क्र.१ वर नमुद केलेल्या अधिसूचनेद्वारे सांगली येथे अतिरीक्त जिल्हा मंच कार्यान्वित केलेले आहे. सदरचे जिल्हा मंच सांगली जिल्हा मंचासमोरील प्रलंबित प्रकरणांची संख्या किमान पातळीवर येईपर्यंत किंवा शासनाच्या पुढील आदेशापर्यंत कार्यान्वित राहणार आहे.

वरील अधिसूचनेत नमुद केल्याप्रमाणे सांगली अतिरीक्त जिल्हा मंचात राज्यातील सध्या कार्यरत असलेल्या व कमी प्रमाणात प्रकरणे प्रलंबित असलेल्या जिल्हा मंचाचे अध्यक्ष, सदस्य तसेच कर्मचा-यांच्या सेवा सदर मंच कार्यान्वित असेल तोपर्यंत उपलब्ध करुन द्यावयाच्या होत्या. त्यास अनुसरुन या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित केलेल्या कार्यालयीन आदेशांन्वये सातारा जिल्हा मंचाच्या मा.अध्यक्ष व मा.सदस्यांच्या सेवा सदरील अतिरीक्त सांगली जिल्हा मंचास उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्यानुसार त्यांचेद्वारे सदरील जिल्हा मंचाचे कामकाज दरमहा तिसरा व चौथा आठवडा सांगली येथे करण्यात येत आहे. तसेच या कार्यालयाच्या कार्यालयीन आदेशांन्वये काही कर्मचा-यांच्या सेवाही सदरील जिल्हा मंचास उपलब्ध करुन दिल्या आहेत.

उक्त शासन अधिसूचनेत नमुद केल्याप्रमाणे सांगली जिल्हा मंचासमोरील प्रलंबित प्रकरणांचे प्रमाण किमान पातळीवर येईपर्यंत अतिरीक्त सांगली जिल्हा मंच कार्यान्वित राहणार असल्याने व सांगली जिल्हा मंचासमोरील प्रलंबित प्रकरणांची संख्या ही किमान पातळीवर असल्याने या आदेशाद्वारे खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) माहे जुलै-२०१५ पासून अतिरीक्त सांगली जिल्हा मंचाचे कामकाज पुर्णतः बंद करण्यात येऊन सांगली मंचासमोरील संपुर्ण कामकाज मुळ सांगली जिल्हा मंचाद्वारेच करण्यात यावे.

२) माहे जुलै-२०१५ पासून सातारा जिल्हा मंचाच्या मा.अध्यक्ष व मा.सदस्यांनी पुर्णवेळ सातारा जिल्हा मंचाचे कामकाज पहावे.

३) माहे जुलै-२०१५ पासून अतिरीक्त सांगली जिल्हा मंचाच्या कामकाजासाठी सेवा वर्ग करण्यात आलेल्या सर्व कर्मचा-यांनी त्यांचे मुळ पदस्थापितीच्या ठिकाणी काम करावे.

हे आदेश मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांचे पूर्वमान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

28/05/15

(अ.सा.वैरागडे)
प्रबंधक विधी,
राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई

प्रति,
मा.अध्यक्ष व मा.सदस्य,
जिल्हा ग्राहक मंच,
सांगली, सातारा व अतिरीक्त सांगली

प्रतिलिपी ः

१) मा.श्री.नरेंद्र कवडे, सदस्य, राज्य आयोग तथा पालक सदस्य,सांगली व सातारा जिल्हा मंच

२) मा.न्यायिक सदस्य व मा.सदस्य, राज्य आयोग, महाराष्ट्र

३) प्रबंधक, जिल्हा मंच, सातारा व सांगली यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी याबाबतची सुचना त्यांचे जिल्हा मंचाच्या कार्यालयाचे सुचना फलकावर प्रदर्शित करावी.

४) प्रबंधक, जिल्हा मंच, सांगली यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी सांगली अतिरीक्त जिल्हा मंचाच्या कामकाजासाठी इतर जिल्हा मंचातुन सेवा वर्ग करण्यात आलेल्या सर्व कर्मचा-यांना माहे जून-२०१५ अखेर कार्यमुक्त करावे.

५) प्रबंधक, जिल्हा मंच, सिंधुदुर्ग

६) सर्व सेवा वर्ग कर्मचारी, सांगली अतिरीक्त मंच

***टीप ः हा कार्यालयीन आदेश राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्रच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेला आहे.***

D:\SC MAH\DISTRCIT FORUM\Additional Forum.doc